# जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत वारणा, कमला कॉलेज अजिंक्य

कोल्हापूर, ता. १५ : कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पुरुष व महिला बास्केटबॉल स्पर्धेत पुरुष गटात वारणा बास्केटबॉल संघाने (वारणानगर), तर महिला गटात कमला संघाने (कोल्हापूर) अजिंक्यपद मिळवले.

पुरुष विभागाच्या अंतिम सामन्यात वारणा बास्केटबॉल संघाने बिद्रीच्या दूधसाखर संघावर ५१ विरुद्ध ४५ गुणांनी विजय मिळवला. वारणेकडून उदय जाधवने २३ व रमेश पायमलने १४ गुण नोंदवले, तर दूधसाखर संघाकडून अमर चौगुलेने २५ व नंदू पाटीलने १० गुण नोंदवले.

महिला विभागाच्या अंतिम सामन्यात कमला कॉलेजने मूव्हर्स क्लबवर १८ विरुद्ध ४ गुणांनी विजय मिळवला. बक्षीस वितरण समारंभ नगरसेवक दिलीप शेटे यांच्या हस्ते व मालोजीराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाला. समारंभास जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. विजय पाटील, सचिव चंद्रशेखर साळोखे उपस्थित होते. स्वागत व आभार जॉ. सेक्रेटरी राजेंद्र दळवी यांनी मानले.

# बास्केटबॉल स्पर्धेत वारणा अजिंक्य

कोल्हापूर, दि. १५ : कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल असो.च्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय पुरुष व महिला बास्केटबॉल स्पर्धेत वारणा बास्केटबॉल, संघ वारणानगरने पुरुष विभागात तर कमला कॉलेज, कोल्हापूरने महिला विभागात अजिंक्यपद मिळविले.

## कोल्हापुरातील कार्यशाळेत पस्तीस जणांचा सहभाग

कोल्हापूर, ता. १७ : जिल्ह्यातील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांसाठी प्रथम वर्ष कला विभागाच्या अर्थशास्त्र विषयातील संख्याशास्त्र या अध्ययन घटकावर येथे कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र संघटनेच्यावतीने येथील कमला महाविद्यालयात घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत पस्तीस प्राध्यापक सहभागी झाले.

प्रा. के. बी. पाटील, प्रा. जी. व्ही. कुंभोजकर, प्रा. ए. एम. बसुगडे, प्रा. एस. के. कुलकर्णी यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेचे उदघाटन झाले. कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. पाटील अध्यक्षस्थानी होते.

प्रा. नेताजी पोवार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. सौ. टी. पी. पाटील व प्रा. सौ. ए. व्ही. पाठक यांनी सूत्रसंचालन केले.